महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | Rs.2/- | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे

शनिवार ❖ २१ डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १७६ ❖ पाने - ४ | RNI NO : MAHMAR/2016/72091 | Postal Reg. No. THC/256/2022-2024

## कल्याण मारहाणप्रकरणी शुक्लासह दोन जण ताब्यात




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

कल्याण : येथील पश्चिमेतील आजमेरा सोसायटीत मराठी कुटुंबियांना केलेल्या मारहाण आणि हल्ला प्रकरणी पोलिसांच्या विशेष पथकांनी शक्रवारी दिवसभरात दोन जण ताब्यात घेतले. या गुन्ह्यातील मंत्रालयीन अधिकारी अखिलेश शुक्ला यांनी शुक्रवारी

### हलगर्जीपणा करणाऱ्या पोलिसांवर कारवाई -उपायुक्तांचे संकेत

त्यांची भूमिका मांडणारी दृश्यध्वनी चित्रफित समाज माध्यमांत सामायिक केली होती. या चित्रफितीच्या आधारे पोलिसांनी शुक्ला यांना टिटवाळा-शहाड भागातून ताब्यात घेतले. आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्यांना अटक केले जाईल, अशी माहिती कल्याण परिमंडळाचे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी येथे माध्यमांना दिली. या प्रकरणात गुन्हा दाखल करताना हलगर्जीपणा करणाऱ्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांची साहाय्यक पोलीस आयुक्त चौकशी करत आहेत. या प्रकरणात ते दोषी आढळून आले तर त्यांच्यावरही कारवाई केली जाईल, असे उपायुक्त झेंडे यांनी माध्यमांना सांगितले. सुमित जाधव (२३), रंगा उर्फ दर्शन बोराडे (२२) यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अभिजित देशमुख यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करणाऱ्या गुन्हा दाखल दहा जणांपैकी दोन जणांना विशेष पथकांनी ताब्यात घेतले आहे. या दोन जणांवर महात्मा फुले पोलीस ठाण्यात यापूर्वी गुन्हे दाखल आहेत. यापुर्वीचे आणि आताचा गुन्हा यांची चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाणार आहे. पोलिसांची चार विशेष पथके उर्वरित हल्लेखोरांचा शोध घेत आहेत, असे उपायुक्त झेंडे यांनी सांगितले. या गुन्ह्याचे स्वरूप आणि तपासात पुढे येणारी माहिती या अनुषंगाने गुन्ह्याची नवीन कलमे या प्रकरणात नोंदवली जाणार आहेत, असे उपायुक्त झेंडे यांनी सांगितले.

या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी आजमेरा संकुल, योगीधाम व्यापारी संघटना, परिसरातील नागरिक, मनसे, उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष, माय मराठी प्रतिष्ठानचे पदाधिकारी यांनी उपायुक्त झेंडे यांच्याकडे केली आहे. या गुन्ह्यातील सहभागींवर १०९ अंतर्गत कारवाई करावी, अन्यथा शिवसेनेतर्फे आंदोलन केले जाईल, असा इशारा उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते विजय साळवी यांनी पोलिसांना दिला आहे.

> कल्याण शहर सर्व समाज, धर्मियांना एकत्र घेऊन चालणारे शहर आहे. मराठीचा अवमान येथे खपवून घेतला जाणार नाही. या प्रकरणाचे राजकारण न करता या गुन्ह्यातील कठोर शिक्षा होईल यादृष्टीने पोलिसांनी तपास करावा.
> ❍ विश्वनाथ भोईर, (आमदार, कल्याण)



## शहापुर : भात खरेदी केंद्रावरील ऑनलाइन प्रक्रिया ठप्प

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

**शहापूर :** शहापूर तालुक्यातील अतिदुर्गम आणि आदिवासी बहुल परिसर समजल्या जाणाऱ्या डोळखांब परिसरातील शेतकऱ्यांना महामंडळाला भात विक्री करण्यासाठी सातबारे ऑनलाईन करण्याची जाचक अट आहे. त्यामुळे या परिसरातील शेतकऱ्यांना शेतीचे सातबारा ऑनलाइन करण्यासाठी डोळखांब येथील बाजारपेठेत रोज हेलपाटे घालावे लागत आहेत. याशिवाय या ठिकाणी आदिवासी महामंडळाने नियुक्त केलेले सुभाष पाटील यांची प्रकृती ठीक नसल्याने ते गेले दहा ते बारा दिवस डोळखांब येथे फिरकलेच नाही. सातबारा ऑनलाइन करण्यासाठी आदिवासी महामंडळाकडून दोन व्यक्तींची नियुक्ती केल्याचे पाटील यांनी सांगितले. या ठिकाणी आदिवासी महामंडळाच्या अधिकारी ऑनलाईन प्रक्रियेसाठी उपस्थित नसल्याने शेतकऱ्यांना रोजच पदरमोड करून डोळखांब येथे हेलपाटे घालावे लागत आहेत. आपल्या हक्काचे भात पीक शासनाच्या हमीभाव भात खरेदी केंद्रावर विक्री करण्यासाठी शेतकऱ्यांची होणारी ससेहोलपट मात्र कोणाच्याही निदर्शनात येत नाही.

शहापूर तालुक्यात सापगांव, मुगांव, आटगांव सावरोली व डोळखांब या ठिकाणी आदिवासी महामंडळामार्फत भात खरेदी केंद्र सुरू करण्यास मंजुरी मिळाली आहे. यापैकी डोळखांब व्यतिरिक्त सर्वत्र भात खरेदी सुरु करण्यात आली आहेत. मात्र डोळखांब येथे गेल्या पंधरा ते वीस दिवसापासून सातबारा ऑनलाइन करण्याची प्रक्रिया ठप्प असल्याने या परिसरातील शेतकरी प्रचंड संतप्त झाले आहेत. याशिवाय दरवर्षी ज्या ठिकाणी महामंडळ मार्फत भात खरेदी सुरू करण्यात येत असे त्या चोंढे येथील गोडाऊनची प्रचंड दूरवस्था झाल्याने त्या ठिकाणी यावर्षी भात खरेदी करणे जिकरीचे बनले आहे. शासनाच्या या अनास्थेमुळे शेतकऱ्यांची प्रचंड ससेहोलपट होणार आहे. सातबारा ऑनलाइन करण्याची अंतिम तारीख ३० डिसेंबर असल्याने शेतकऱ्यांची एकच तारांबळ उडाली आहे.



> सुभाष पाटील यांची प्रकृती ठीक नसल्याने ते डोळखांब येथे ऑनलाइन प्रक्रियेसाठी येऊ शकले नाही. दोन नवीन कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय भाडेतत्त्वावर गोडाऊन उपलब्ध होत नसल्याने डोळखांब परिसरातील भात खरेदी थांबली आहे.
> ❍ सागर सोनवणे, आदिवासी महामंडळ व्यवस्थापक

## भातसानगर येथे नवोदय विद्यालयासाठी आमदार निरंजन डावखरे आग्रही

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**



**ठाणे, दि. २०:** शहापूर तालुक्यातील भातसानगर येथे नवोदय विद्यालय सुरू करण्यासाठी राज्य सरकारने तत्काळ कार्यवाही सुरू करावी, अशी मागणी भाजपाचे आमदार निरंजन डावखरे यांनी आज नागपूर येथे विधान परिषदेत अर्थसंकल्पीय पुरवणी मागण्यांवरील चर्चेत केली. केंद्र सरकारच्या मनुष्यबळ विकास खात्यामार्फत ठाणे जिल्ह्यासाठी स्वतंत्र नवोदय विद्यालय स्थापन करण्यास मंजुरी दिली असून, याबाबत अधिसूचना जारी केली आहे. ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात भातसानगर येथे नवोदय विद्यालयासाठी जागा उपलब्ध आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने तत्काळ नवोदय विद्यालय सुरू करण्यासाठी कार्यवाही करावी, अशी मागणी आमदार डावखरे यांनी केली. गेल्या काही वर्षांपासून ठाणे जिल्ह्यात स्वतंत्र नवोदय विद्यालयासाठी आमदार निरंजन डावखरे यांच्याकडून पाठपुरावा केला जात आहे.

**वैद्यकीय महाविद्यालयात प्राध्यापक नेमावेत**

पालघर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात नव्याने सुरु झालेल्या वैद्यकीय महाविद्यालयात अन्य जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापकांची नियुक्ती केली जात आहे. त्यामुळे जुन्या वैद्यकीय महाविद्यालयात विद्यार्थ्यांवर परिणाम होत असून, नव्या महाविद्यालयासाठी प्राध्यापकांची भरती करावी, अशी मागणीही आमदार डावखरे यांनी केली.



## कल्याण मुरबाड रस्ता रुंदीकरणात महामार्ग अधिकारी ठेकेदारांची मुजोरी

### बाधित शेतकऱ्यांचा आंदोलनाचा इशारा | भू संपादनाचा मोबदला न देताच रस्त्याचे काम सुरु

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण मुरबाड रस्ता रुंदीकरण काम सध्या जोरात सुरु आहे. हे काम आर आर असम येजन्सी मार्फत सूरू आहे. या २५ किमी रस्त्याचे रुंदीकरण चौपदरीकरण कामासाठी साडे सातसे कोटिहून अधिक रक्कम मंजूर केलेली आहे.

रायते येथे उल्हास नदीवर व मुरबाडी नदीवर धानिवली येथे पूल. मुरबाड येथे उड्डाणं पूल या रुंदीकरण कामात समाविष्ट आहे. या रस्त्याचे काम मार्च २०२४ मध्ये सुरु करण्यात आले आहे. या रुंदीकरणासाठी असणाऱ्या रस्त्याच्या दोन्हीबाजूला भू संपादन करण्यात आले आहे. त्यासाठी ठेकेदाराने शेताकऱ्याशी गोड बोलून, वेळ प्रसंगी पोलीस बळाचा वापर करत आपले काम जोरात सुरु केले आहे.

गोवेली ते किशोर, पोटगाव, बापसई, कोलिंब, मामणोली कुंदे वांजले, नवगाव, रेवती येथील अनेक शतकऱ्यांची जमीन बळजबरीने घेऊन रस्ता रुंदीकरण काम होत असताना. शेतकरयांना मात्र अद्याप कोणताही मोबदला देण्यात आलेला नाही.

आर आर असम कंपनी ने हा ठेका घेतला आहे. राज्यस्थान येथील ही कपंनी आहे. कपंनी ने आपले काम उरकवण्याची घाई केली आहे. त्यासाठी जमीन संपादन न करता खाजगी शेतकऱ्यांच्या जमिनी मनमानी करून ताब्यात घेऊन गटारे दोन्ही बाजूने बांधली आहेत.

शेतकऱ्यांना कोणताही मोबदला दिलेला नाही. राष्ट्रीय महामार्गचे अधिकाऱ्यांनी बघ्याची भूमिका घेतली आहे. वर्ष झाले रस्ता भुसपादन प्रक्रिया फक्त कागदोपत्री सुरु आहे ठेकेदार शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत चालढकल पणा करत आहे. या रस्त्यालगत असणारी जुनि झाडे समूळ नष्ट केली आहेत. तालुका वनविभाग मुद्दाम डोळेझाक करत आहे आहे. असे ढोबळ उत्तर अधिकारी देतात.

**जुन्या झाडाची कत्तल.**

या रस्ता रुंदीकरण कामात आड येणारी शंभर वर्षा हुन अधिक वयोमान असणाऱ्या वडा सह अन्य झाडाची कत्तल करण्यात आलेली आहे. वनविभाग आदिकाऱ्यांनी या गोष्टीकडे मुद्दामहून दुर्लक्ष केले आहे. यथे काही तरी पाणी मुरत असल्याचा संशय नागरिकांचा आहे. या रुंदि करण प्रक्रियेत वडिलोपार्जित जमीन बाधित होते.

> कल्याण मुरबाड रस्ता रुंदीकरण कामात शेतकरयांच्या बाजूने कोणीच नाही. बिचारा बाधित शेतकरी हवालदिल झालेला आहे.
> - सुलभा नरसिंगे, शेतकरी

या रस्त्यारुंदीकरण कामात उदाहणे देत, गैरव्यवहार व भष्टाचार कशाप्रकारे झाला आहे या बाबत संतप्त शेतकऱ्यांनी माहिती दिली.

राष्ट्रीय महामार्ग अधिकारी जोती जाधव यां शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत जागृत नाहीत त्यांची उदासीन धोरण यामुळे शेतकरी मोबदला मिळाला नाही तर आंदोलनाचा इशारा दिला आहे.




## खैराची अवैध वाहतूक रोखण्यात वन विभागला यश

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर :** दहिवली राउंडमधून खैर लाकडाची अवैध वाहतूक करणाऱ्या तस्करांच्या गाडीला पकडण्यात वन कर्मचाऱ्यांना यश आले आहे. मात्र आरोपी पसार होण्यात यशस्वी झाले.

दहिवलीमधील कं.नं. ८५० दहिवली कर्मचाऱ्यांचे आरोपीला पकडण्यासाठी पथक तयार करुन वनपाल वनरक्षक यांना ठराविक ठिकाणी दबा धरुन बसण्यासाठी सांगुन पहाटे सव्वा चारच्या सुमारास एक पांढऱ्या रंगाची महिंद्रा पिकअप गाडी जंगलात जावून अवैधरित्या



वृक्षतोड केलेल्या खैराचे नग भरत होती. या दरम्यान शासकीय गाडी रस्त्याचे मधोमध आडवी लावुन सदर पिकअपच्या दिशेने कर्मचारी चालुन गेले असता अंधाराचा फायदा घेऊन आरोपीने जंगलात धूम ठोकल्याचे सांगण्यात आले.

कर्मचाऱ्यांनी आरोपीचा पाठलाग

### हातावर तुरी देऊन तस्कर पसार

केला पण जंगलात काळोख जास्त असल्याने आरोपी पळून गेले असल्याचे प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. तथापी गाडी व मुद्देमाल पकडण्यात पथकाला यश आले. याबाबत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेले वाहन व मुद्येमाल काष्ठ विक्री आगार आसनगांव येथे जमा करणेत आला आला आहे. गुन्ह्याची कसून चौकशी चालु आहे. गुन्ह्यातील आरोपींना पकडण्यासाठी पथक तयार करण्यात आले असल्याची माहिती वन परीक्षेत्र अधिकारी शैलेश गोसावी यांनी दिली.

दुर्मिळ वनसंपदा असल्याने त्याची तोड करण्यास अथवा विक्री करण्यास बंदी असलेल्या खैराची बेकायदेशीर तोड करून लाखो रुपयांचा सरकारी महसुल बुडवल्याची घटना शहापूर तालुक्यातील शहापूर वन क्षेत्रात घडली होती. याबाबत 'ठाणेवैभव'ने वृत्त प्रसिद्ध केले होते. या वृत्ताची गंभीर दखल घेत वन विभाग सक्रिय झाल्याचे या कारवाईनंतर दिसून आले. मोठ्या प्रमाणात झालेल्या या बेकायदा खैर तोड करणाऱ्या तस्करांना वन विभागाला सध्यातरी अपयश आल्याचे दिसून येत आहे. आरोपी फरार झाले असून वन अधिकाऱ्यांची आता खरी कसोटी लागणार आहे.



शहापूर तालुक्यात खैरांची बेकायदा कत्तल

वनविभागाचे दुर्लक्ष

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : दुर्मिळ वनसंपदा असल्याने त्याची तोड करण्यास अथवा विक्री करण्यास बंदी असलेल्या खैराची बेकायदेशीर तोड करून लाखो रुपयांच्या सरकारी महसुलाला चुना लावल्याची घटना शहापूर तालुक्यातील शहापूर वन क्षेत्रात स्थानिक शेतकऱ्यांच्या जागरूकतेमुळे समोर आली आहे. मात्र या...

अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने उचलला आहे की काय, अशी शंका येऊ लागली आहे. शहापूर वनविभागामधील शहापूर वनक्षेत्रात मोठ्या प्रमाणात खैर झाडे आहेत. या पूर्वी शहापूर वनाधिकारी, वनपाल व वनरक्षक यांनी अवैध खैर वृक्ष तोड यावर नियंत्रण मिळवून अनेक आरोपी व वाहने जप्त केली होती...

दै.ठाणे जीवनदीप ने दि. ९ डिसेंबरच्या अंकातून वनविभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपास्थित केले होते.

# डोंबिवली स्टेशन परिसरात फेरीवाल्यांवर कडक कारवाई



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/** डोंबिवली(शरद शहाणे)

कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या डोंबिवली स्टेशन परिसरातील 'फ' वार्डात रस्ता आणि पदपथाचा वापर करून भाजीवाले आणि इतर व्यवसायिक राजरोसपणे व्यवसाय करीत असतात त्यामुळे महापालिकेचा कर भरणाऱ्या सामान्य नागरिकांना अनेक प्रकारचा त्रास सोसावा लागतो रस्त्याने धड चालता येत नाही वाहनांना होणाऱ्या नेहमीच्या अडथळे महा पालिकेच्या बस सुद्धा हळुवारपणे जातात हे सर्व अनेक वर्षांपासून चालू आहे अनेक वेळा अधिकारी कर्मचारी कारवाई करतातच परंतु सर्वच अधिकारी सर्व अधिकार संपूर्ण वापर करीत नाही त्यात काही राजकीय, सामाजिक हस्तक्षेप चालूच असतात परंतु गेल्या काही महिन्यांपासून या वार्डात अत्यंत कठोर आणि सर्व कायदे वापरून कारवाई केली जात आहे त्यामुळे रस्ता आणि फुटपाथ अडवून व्यवसाय करणाऱ्या चे धाबे दणाणले ही कारवाई वॉर्ड ऑफिसर हेमा मुंबरकर आणि त्यांचे कर्मचारी सातत्याने आणि अत्यंत कठोर पद्धतीने सर्व कायद्यांचे आणि वरिष्ठांचे सर्व आदेशांचे पालन करून अत्यंत कठोर कारवाई करीत आहे त्यामुळे प्रभागातील नागरिक आणि दुकानदार जे कर भरतात या सर्वांनी समाधान व्यक्त केले आहे आणि वाहनांचे अडथळे अनेक प्रकाराने दूर झालेले आहेत.

सामान्य नागरिक वॉर्ड ऑफिसर यांना भेटून धन्यवाद देतात आणि म्हणतात असेच कायम काम करावं अशी आशा बाळगतात. हेमा मुंबरकर यांना कुठल्याही प्रकारचे भय वाटत नाही आपल्याला दिलेले काम चोख करायचे यातच त्यांना आनंद आहे.

आतापर्यंत त्यांनी असेच काम अनेक वॉर्डात केलेले आहे. हीच त्यांची ख्याती आहे.वॉर्ड ऑफिसर हेमा मुंबरकर यांनी कर्मचाऱ्यांना कठोर कारवाईचे आदेश दिलेत आणि केलेल्या कारवाई बद्दल अभिनंदन सुद्धा केले.

# मराठी कुटुंब मारहाण प्रकरणी राजकीय नेते एकवटले

## पोलिस उपायुक्तांची घेतली भेट

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी) :**

कल्याण पश्चिमेतील योगीधाम मधील मराठी कुटुंबाच्या मारहाणीचे प्रकरणाचे तीव्र पडसाद उमटले असून, या प्रकरणी राजकीय पक्षांसह सामाजिक संस्था, व्यापारी संघटना आणि सोसायटीमधील रहिवाशांनी कल्याण परिमंडल ३ चे पोलिस उपायुक्त अतुल झेंडे यांची भेट घेत आरोपींना अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. मारहाण करणाऱ्या अखिलेश शुक्ला याला त्वरित अटक करून त्याचे निलंबन करण्यात यावे, गुन्हा दाखल करण्यास उशीर करणाऱ्या एपीआय लांडगे यांचे पण निलंबन करा आदी मागण्या यावेळी या नगरिकांनी केल्या. आरोपीला अटक न केल्यास उद्या दुकाने बंद करून कल्याण मुरबाड रोड बंद करणार असल्याचा इशारा यावेळी पोलिसांना देण्यात आला.



या शिष्टमंडळात मनसेचे जिल्हा अध्यक्ष उल्हास भोईर, मनसेच्या महिला शहर अध्यक्षा कस्तूरी देसाई, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते विजय साळवी, रुपेश भोईर, माय मराठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन जाधव, सचिव अतुल सरगर, योगीधाम व्यापारी संघटनेचे उमेश वाघ, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख अरविंद मोरे, जिल्हा संघटक छाया वाघमारे, शहर संघटक नेत्रा उगले, गणेश जाधव, अनघा देवळेकर, मराठा क्रांती मोर्चाचे धनंजय जोगदंड आदींसह प्रमुख पदाधिकारी यांच्यासह योगीधाम येथील स्थानिक नागरिकही उपस्थित होते.

खडकपाडा पोलिसांनी या अखिलेश शुक्लाला पाठीशी घालण्यासह या मारहाणीत गंभीर जखमी कुटुंबाला मात्र अन्याय वागणूक दिल्याचे गंभीर आरोप या शिष्टमंडळाने केले. या प्रकरणी आरोपीला वाचवण्यासाठी पोलीस अधिकाऱ्यांनी वेगळीच कलमे दाखल केली तसेच शुक्ला पोलीस ठाण्यात येऊनही त्याला ताब्यात न घेता पळून जाण्यासाठी मदत केल्याचा गंभीर आरोपही यावेळी बैठकीत करण्यात आला. देशमुख कुटुंबावर भ्याड हल्ला करणाऱ्या शुक्लाचा निषेध करण्यात येत असून, मुख्य आरोपीला अटक न केल्यास उद्या योगिधाम परिसर बंद ठेवण्यात येणार असून या बंदचे काही विपरीत परिणाम झाल्यास त्याला सर्वस्वी पोलिस प्रशासन जवाबदार असेल असा इशारा मनसेचे जिल्हाध्यक्ष उल्हास भोईर यांनी दिला.

अखिलेश शुक्ला हा मंत्रालयात अधिकारी असल्याने पोलिस प्रशासन त्याला पाठीशी घालत असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने केला आहे. ४८ तास होऊन देखील अखिलेश शुक्ला याला अटक होत नाही. या प्रकरणामुळे मराठी माणूस भडकला तर इथे राहणाऱ्या प्रत्येक परप्रांतीयाला धोका निर्माण होऊ शकतो. पोलिसांनी १०९ कलम न लावल्याने त्यांची पक्षपाती भूमिका दिसून येत असून हे कलम न लावल्यास मोठे जनआंदोलन छेडण्याचा इशारा शिवसेना उद्धव बाळसाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते विजय साळवी यांनी दिला. तर या प्रकरणी शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख अरविंद मोरे यांनी देशमुख कुटुंबावर हल्ला करणाऱ्या अखिलेश गुप्ता याला कठोर शिक्षा झालीच पाहिजे अशी मागणी करत राडा करणारे ठाकरे गटाचे कार्यकर्ते असल्याचा गंभीर आरोप केला आहे. मनसेला पराभव पचवता आला नसल्याने मनसेने या प्रकरणात मराठी परप्रांतीय वाद केल्याची टीका देखील अरविंद मोरे यांनी केली आहे.

दरम्यान योगिधाम येथील माय मराठी प्रतिष्ठान आणि योगिधाम व्यापारी संघटना यांनी या प्रकरणी पोलिसांच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करत पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यात दिरंगाई केल्याचे आणि कलमे देखील कमी लावल्याचा आरोप केला आहे. शुक्ला याला अटक करण्यासह त्याला पाठीशी घालणाऱ्या पोलिसांवर देखील कारवाईची मागणी केली.

# कल्याण पूर्वेत गृहमंत्री अमित शहा यांच्या विरोधात मोर्चा काढून निदर्शने



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संसदेमध्ये केलेला एकेरी उल्लेख, आणि अपमानास्पद उदगार काढणाऱ्या देशाचे गृहमंत्री अमित शहा यांच्या वक्तव्याचा निषेध करत कल्याण पूर्व मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक उपोषणकर्ते प्रशांत बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. माता रमाई चौक येथून रमाईला पुष्पहार अर्पण करून निषेध आंदोलन सुरू करण्यात आले. माता रमाई चौक ते तिसगाव नाका आणि पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञानकेंद्र स्मारक पर्यंत पायी निषेध रॅली काढून आंबेडकर प्रेमी जनतेने तीव्र शब्दात अमित शहा यांचा निषेध केला.

या निषेध रॅलीमध्ये रस्त्यावरील काही लोकांनी येऊन अमित शहा यांच्या बॅनरवर जोडे मारले. एकेकाळचा तडीपार माणूस लोकशाही आणि संविधानामुळे देशाचा गृहमंत्री झाल्यानंतर त्यांची मानसिकता काय असावी याबद्दल या निषेध आंदोलनामध्ये आंबेडकर प्रेमी जनतेने आपल्या भावना व्यक्त केल्या.

यावेळेस अण्णा रोकडे, देवचंद अंबादे, प्रशांत बनसोडे, भारत सोनवणे, सुमेध हुमणे, अशोक भोसले, पराग मेंढे, केतन रोकडे, लता वानखेडे, पल्लवी जाधव, सिंधू मेश्राम, अलका साळवी, आशा रसाळ, दिगंबर मेश्राम, संतोष उभाळे, साहेबराव सावंत, नितीन कर्डक, मिलिंद सपकाळ, राजेंद्र नितनवरे, अरुण अहिरे, शेखर केदारे, अशोक पंडागळे, संजय तेलोरे, रमेश केदारे, प्रदीप देसाई, भास्करचंद्र मोरे, नरेश कांबळे, मनीष बनकर, चंद्रमणी मेश्राम, संतोष जाधव, सुरज पवार आदींसह सर्वपक्षीय आंबेडकर प्रेमी जनता उपस्थित होती.

# रोजगार हमी योजनेतील मजुरांच्या खात्यात २ हजार ८५६ कोटी रुपये जमा



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ मुंबई(प्रतिनिधी) :**

दि. २१ : राज्यातील रोजगार हमी योजनेतील मजुरांच्या बँक खात्यामध्ये सन २०२४- २५ मध्ये २ हजार ८५६.३० कोटी रुपयांचा निधी जमा करण्यात आल्याची माहिती रोजगार हमी योजना विभागाकडून देण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत १०० दिवसांपर्यंतची मजुरी केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीमधून दिली जाते. तर १०० दिवसांच्या वरील मजुरी राज्या शासनाच्या निधीतून दिली जाते. त्यानुसार सन २०२४-२५ मध्ये १०० दिवसांपर्यंत मजुरीचे २ हजार ६१६.३० कोटी निधी आणि १०० दिवसांवरील मजुरीचे २४० कोटी रुपये असा एकूण २ हजार ८५६.३० कोटी निधी मजुरांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात आला आहे.

केंद्र व राज्य शासनाकडून सन २०२४-२५ मध्ये अनुक्रमे ६६.२१ कोटी व ५.८८ कोटी रुपये असा एकूण ७२.०९ कोटी इतका निधी मजुरीपोटी पालघर जिल्ह्यातील मजुरांच्या खात्यात जमा करण्यात आला असल्याची महितीही 'रोहयो' विभागाने दिली आहे.

# श्री गुरुदेव दत्त मंदिर नूतनीकरणाचा भूमिपूजन सोहळा संपन्न



दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी) :

श्री गुरुदेव दत्त संस्थान, कल्याण यांच्या वतीने कल्याण पश्चिमेतील सुप्रसिद्ध दत्त आळी परिसरातील श्री गुरुदेव दत्त मंदिर नूतनीकरणाचा भूमिपूजन सोहळा आज जगद्गुरू शंकराचार्य विद्या नृसिंह स्वामी, करवीर (कोल्हापूर) पीठ यांच्या आशीर्वादाने तसेच परम पूज्य सदगुरू श्री ओमकार महाराज रत्नाकर (संस्थापक/अध्यक्ष-श्री रत्नाकर महाराज संस्थान विश्वस्तव्यवस्था, इंदगाव) ,वंदनीय श्री अवधुतानंद महाराज (सदगुरू श्री स्वामी समर्थ सेवा ट्रस्ट कल्याण) आणि मा. आमदार नरेंद्र पवार यांच्या पत्नी सौ.हेमा नरेंद्र पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत अतिशय पवित्र वातावरणात पार पडला.

या अभूतपूर्व सोहळयानिमित्त सौ.पवार यांनी श्री गुरूदेव दत्त यांचे दर्शन घेत आराधना करून मंदिराच्या भूमिपूजनप्रसंगी श्रीफळ वाढवून परम पूज्य सदगुरू श्री ओमकार महाराज रत्नाकर व वंदनीय श्री अवधुतानंद महाराज यांचे दर्शन घेतले.

यावेळी श्री गुरुदेव दत्त संस्थान सर्व पदाधिकारी, परिसरातील सर्व रहिवाशी व मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

# नवी मुंबई पालिका शिक्षण विभागाच्या वतीने विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ नवी मुंबई(प्रतिनिधी) :**

दि. २१ : गुणवत्तापूर्ण पाठ्यपुस्तकी शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जात असून नमुंमपा शाळांतील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रूजविण्यासाठी महा पालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्साही सहभाग घेत हा उपक्रम यशस्वी केला.

नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने दिवा ऐरोली येथील नमुंमपा शाळा क्र. ४८, ९१, १२० याठिकाणी नमुंमपा शालेय स्तरावरील विज्ञान



प्रदर्शन संपन्न झाले. ज्यामध्ये विद्यार्थी, शिक्षकांनी उत्साही सहभाग घेत हा उपक्रम यशस्वी केला.

शिक्षण विभागाच्या उपआयुक्त श्रीम.संघरत्ना खिल्लारे यांच्या हस्ते, शिक्षणाधिकारी श्रीम. अरुणा यादव यांच्या प्रमुख उपस्थितीत या प्रदर्शनाचे दिमाखदार उद्घाटन करण्यात आले. नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाचे सर्व प्र.विस्तार अधिकारी व केंद्र समन्वयक याठिकाणी उपस्थित होते.

या विज्ञान प्रदर्शनासाठी इयत्ता ६ वी ते ८ वी, इ. ९ वी ते १२ वी तसेच दिव्यांग विद्यार्थी, शिक्षक असे एकूण ०६ गट होते. यामध्ये नवी मुंबईतील १० केंद्रांतून उत्कृष्ट ४१ प्रयोग प्रकल्प निवडण्यात आले होते. विद्यार्थी व शिक्षक यांनी सादर केलेल्या प्रकल्पांमधून त्यांची सर्जनशीलता, नवनिर्मिती, सादरीकरण यांचे दर्शन घडले. परीक्षण करण्यासाठी आलेल्या परीक्षकांनी अत्यंत पारदर्शकपणे परीक्षण करून प्रत्येक गटातून एका उत्कृष्ट प्रकल्पाची निवड केली. उपस्थित सर्व मान्यवरांनी प्रदर्शनास भेट देऊन सादर केलेल्या प्रकल्पांची पाहणी केली व विद्यार्थी - शिक्षकांशी संवाद साधला.या नमुंमपा स्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे संपूर्ण नियोजन प्र. विस्तार अधिकारी तथा केंद्र समन्वयक ऐरोली श्रीम. सुप्रिया पायरे यांनी ऐरोली गटातील शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्यातून उत्तम रितीने केले .

# कॅन्सर विरोधात धावणार टिटवाळ्यातील नागरिक

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :**

टिटवाळा मध्ये सामाजिक जाणीव ठेवून रन फॉर फाईट अगेन्स्ट कॅन्सरसाठी रेड स्वस्तिक सोसायटी, स्पर्श फॉउंडेशन, स्पंदन फॉउंडेशन, व आनंद होम्स यां संस्थानी मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी ५ जानेवारी रोजी या मॅरेथॉनला टिटवाळयातीं गणपती मंदिर येथून सकाळी ६ वाजता सुरवात होणार आहे. यामध्ये ५ कि.मी आणि ३ कि.मी असे गट असणार आहेत. टिटवाळयातील व आजूबाजूच्या परिसतील युवा वर्ग, नागरिक यांनी आपली सामाजिक बांधिलकी जपत या उपक्रमा मध्ये जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन प्रमोद नांदगावकर यांनी केले आहे.

# महायुती सरकारने रिक्षाचालकांचे प्रलंबित प्रश्न सोडवावेत

## कोकण विभाग रिक्षा टॅक्सी महासंघाने हिवाळी अधिवेशनात उपमुख्यमंत्री व आमदारांना दिले निवेदन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/नागपूर(प्रतिनिधी) :**

दि. २१ : कोकण विभाग रिक्षा टॅक्सी महासंघ रिक्षा टॅक्सी चालकांचे ज्वलंत भेडसावणाऱ्या समस्या प्रश्न सोडविण्याबाबत सतत प्रयत्न व पाठपुरावा केला जात आहे. कोकण विभाग रिक्षा टॅक्सी महासंघाचे अध्यक्ष प्रणव पेणकर यांनी पदाधिकाऱ्यांच्या समवेत नागपूर येथे हिवाळी अधिवेशनात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री भरत गोगावले, दादा भुसे, आमदार किसन कथोरे, दौलत दरोडा यांची भेट घेऊन निवेदन दिले. नागपूर येथे हिवाळी अधिवेशनात प्रणव पेणकर यांच्या समवेत कोकण विभाग रिक्षा टॅक्सी महासंघाचे अविनाश खिलारे, जितेंद्र पवार, संतोष नवले, भुषण लांडगे आदी पदाधिकारी उपस्थित होते. रिक्षा टॅक्सी चालकांना वाहतुक पोलीसांकडून फोटो शूट इ-चलन पंधराशे रुपये दंड कमी करावा वाहतुक पोलीसांकडून डिव्हाइस विना खाजगी मोबाईल फोन वर फोटो शूट इ-चलन कारवाई करु नये. रिक्षा टॅक्सीचीं अमाप वाढणारी संख्या नियंत्रण खुले नवीन रिक्षा टॅक्सी परवाने वाटप बंद करावी इलेक्ट्रिक इ -रिक्षांना परवाना सक्ती बंधनकारक करावा अशा विविध प्रकारच्या समस्यांचा निवेदनात समावेश आहे. रिक्षा टॅक्सी चालकांच्या ज्वलंत भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न कोकण विभाग रिक्षा टॅक्सी महासंघाच्या वतीने केले जातील महायुतीचे सरकार रिक्षा टॅक्सी चालकांच्या ज्वलंत प्रश्नांची दखल घेईल असे प्रणव पेणकर यांनी स्पष्ट केले.

# दैनिक राशिफल

२१ डिसेंबर २०२४ शनिवार

**मेष**

काही विशेष कामाबाबत कुटुंबात परस्पर चर्चा होईल. तुमच्या निर्णयाला विशेष प्राधान्य मिळेल. आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल.

**वृषभ**

तुमची काही कामे वेळेवर पूर्ण न झाल्यामुळे तुम्हाला काही समस्यांना सामोरे जावे लागेल.आजचा दिवस तुमच्यासाठी खास असणार आहे.

**मिथुन**

नवीन वाहन घेण्याचे तुमचे स्वप्न आज पूर्ण होईल. तुम्हाला तुमची प्रतिमा आणखी सुधारण्याची संधी देखील मिळेल. प्रिय मित्र समस्येवर उपाय शोधेल.

**कर्क**

आज तुमच्या व्यवसायाच्या मंद गती मुळे तुम्ही चिंतेत असाल. तुमच्या मनात चाललेल्या काही गोष्टी तुम्ही तुमच्या पालकांशी बोलू शकता.

**सिंह**

नवीन काम सुरू करण्यासाठी आजचा दिवस चांगला जाईल. आज तुम्हाला कोणत्याही कायदेशीर प्रकरणात विजय मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या**

आज तुम्ही तुमचे विचार कोणाशी तरी शेअर कराल आणि तो तुमच्या बोलण्याला महत्त्व देईल.आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे.

**तूळ**

तुम्ही लहान मुलांसाठी भेटवस्तू आणू शकता. तुम्ही तुमच्या गुरूकडून करिअरचा सल्ला घेऊ शकता.आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे.

**वृश्चिक**

काही मुद्द्यावरून कुटुंबातील काही सदस्यांवर नाराज राहाल. विद्यार्थ्यांना अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे लागेल. मुलांशी काही मुद्द्यावर वाद होऊ शकतो.

**धनु**

तुमच्या मुलाच्या नोकरीशी संबंधित कोणतीही समस्या हाताळण्यात व्यस्त असाल.सासरच्या व्यक्तींशी असलेल्या तक्रारी दूर करण्याची संधी मिळेल.

**मकर**

काम अतिशय काळजीपूर्वक आणि कार्यक्षमतेने कराल. मुलांची कोणतीही चिंता दूर होईल. मेहनतीचे नजीकच्या भविष्यात उत्कृष्ट फळ मिळणार आहे.

**कुंभ**

सर्व काही ठीक होईल.आज तुमच्या दिवसाची सुरुवात थोडी कमकुवत असेल, पण नंतर चांगला नफा मिळाल्यास तुम्ही आनंदी व्हाल.

**मीन**

तुमच्या कार्यक्षेत्रात तुमच्या आवडीचे काम मिळाल्याने आनंद होईल.आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल असणार आहे. आज प्रगतीचे नवीन मार्ग उघडतील.

दैनिक जीवनदीप वार्ता

मध्ये कंपनी, मिळकत, जमीन– जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातींना केवळ ५००/– रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.

:: कार्यालय ::

९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१

– E Mail –

jeevandeepvartanews2020@gmail.com news.thanejeevandeep@gmail.com

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना

# तरुणांना उद्योजक बनण्याची सुवर्णसंधी

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

दि.२१ : राज्याच्या नवीन औद्योगिक धोरण-२०१९ अंतर्गत अनेक नाविन्यपूर्ण योजना व कार्यक्रम महाराष्ट्र शासनाने हाती घेतले आहेत. सूक्ष्म व लघु उपक्रमांना चालना देण्यासाठी तसेच राज्यात व्यापक प्रमाणात रोजगाराच्या संधी स्थानिक ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना जाहीर केली आहे.

**योजनेचा उद्देश:-** राज्यातील युवक/युवतींच्या सर्जनशिल तेला वाव मिळून राज्यात स्वयंरोजगारास पूरक वातावरण तयार करणे, त्याद्वारे राज्यात ग्रामीण तसेच शहरी क्षेत्रात सूक्ष्म, लघु उपक्रमांद्वारे व्यापक रोजगाराच्या संधी निर्माण होण्यासाठी शासनाच्या आर्थिक सहाय्यातून प्रकल्प उभारणीस हातभार लावणे.

**पात्रता व अटी:-** राज्यात स्थानिक अधिवास असलेल्या व किमान १८ से ४५ वयोगटातील स्वयंरोजगार करू इच्छिणारे उमेदवार. विशेष प्रवर्गासाठी (अनुसूचित जाती, जमाती, महिला, अपंग, माजी सैनिक, इ.मा.व.वि. जा., अ.ज., अल्पसंख्याक) ५ वर्षांची अट शिथिल, रु.१० लाखावरील प्रकल्पांसाठी किमान शैक्षणिक पात्रता ७ वी पास व रू.२५ लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान १० वी पास, अर्जदाराने यापूर्वी अनुदान समाविष्ट असलेल्या राज्य तसेच केंद्र शासनाच्या/महामंडळाच्या योजनेतून लाभ घेतलेला नसावा.

**प्रकल्प मर्यादा किंमत:-** प्रक्रिया व निर्मिती प्रकल्पांसाठी कमाल रु.५० लाख व सेवा, कृषी पूरक उद्योग प्रवर्गातील प्रकल्पांसाठी कमाल रु.२० लाख. योजना अंमलबजावणी यंत्रणा - शहरी भागासाठी जिल्हा उद्योग केंद्र, ग्रामीण भागांसाठी जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालय एकत्रित समन्वय व सनियंत्रण, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.

**आर्थिक अनुदान:-** प्रवर्ग व स्थाननिहाय १५ टक्के ते ३५ टक्के पर्यंत अनुदान अनुज्ञेय आहे आणि स्वगुंतवणूक ५ टक्के ते १० टक्के राहील. वित्तीय संस्था/ बँक -सर्व राष्ट्रीय बँका, खाजगी बँका तसेच रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत प्रकरण करता येईल.

**योजनेंतर्गत पात्र घटक:-** सेवा उद्योग, कृषी पूरक व्यवसाय, कृषीवर आधारीत उद्योग, ई. वाहतूक व्यवसाय,फिरते विक्री केंद्र इ., अर्जाच्या संपूर्ण प्रक्रियेसाठी https://maha-cmegp.gov.in, ऑनलाईन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. उत्पादन प्रवर्गातील उद्योगांसाठी २ आठवडे व सेवा, कृषीपुरक उद्योग व्यवसायासाठी १ आठवडा मुदतीचे प्रशिक्षण असेल.

**आवश्यक कागदपत्रे:-** जन्मदाखला/शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/वयाचा पुरावा, शैक्षणिक पात्रतेसंबंधीचे कागदपत्रे प्रमाणपत्रे, आधारकार्ड, पॅनकार्ड, नियोजित उद्योग, व्यवसाय जागेबाबतचे दस्ताऐवज, भाडेकरार (सध्या कागदावरील प्राथमिक संमती), बँक मंजुरीनंतर नोंदणीकृत भाडेकरार बँकेस सादर करावा लागेल, जातीचे प्रमाणपत्र (एस.सी.एस.टी. प्रवर्गासाठी), विशेष प्रवर्गासाठीचे पूरक प्रमाणपत्र (अपंग, माजी सैनिक), वाहतुकीसाठी परवानगी व वाहन चालविण्याचा परवाना, स्वसाक्षांकित विहित नमुन्यातील वचनपत्र (Undertaking).

या योजनेच्या कार्यवाहीविषयी अधिक माहितीसाठी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे, एमआयआडीसी ऑफिस कॉम्प्लेक्स बिल्डींग, मुलुंड चेक नाका समोर, ठाणे पश्चिम येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक सोनाली देवरे यांनी केले आहे.

# प्लायवूड कारखान्याला भीषण आग

## नायगाव कारखान्यातील साहित्य जळून खाक



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता वसई(प्रतिनिधी) :**


दि.२१ : नायगाव पूर्वेच्या बापाणे परिसरात असलेल्या एका प्लायवूड कारखान्याला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. शुक्रवारी सकाळी सव्वा सहाच्या सुमारास ही घटना घडली. दोन ते तीन तासांच्या अथक प्रयत्नानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी आग नियंत्रणात आणली. या आगीत कारखान्यातील साहित्य जळून खाक झाले आहे.

नायगाव पूर्वेच्या बापाणे येथे एम आर पी इंडस्ट्रियल इस्टेट आहे. यात प्लायवूड तयार करण्याचा कारखाना आहे.शुक्रवारी सकाळी सव्वा सहा वाजण्याच्या सुमारास अचानक पणे आग लागली. या आगीच्या घटनेमुळे आजूबाजूच्या परिसरात खळबळ उडाली होती. याची माहिती महा पालिकेच्या अग्निशमन दलाला मिळताच घटनास्थळी पोहचून आगीवर नियंत्रण मिळविण्याचे काम सुरू केले होते. या कारखान्यात विविध प्रकारचे लाकडी साहित्य असल्याने आगीची तीव्रता अधिक वाढली होती. त्यामुळे आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाच्या जवानांना शर्थीचे प्रयत्न करावे लागले.

दोन ते तीन तासाच्या अथक प्रयत्नानंतर आग नियंत्रणात आली.या आगीत सुदैवाने कोणतीही जिवीतहानी झाली नसून प्लायवूड कारखान्यातील मोठ्या प्रमाणात साहित्य जळून खाक झाले आहे. नेमकी आग कोणत्या कारणामुळे लागली याचे कारण ही अजून समजू शकले नाही. या आजू बाजूला नागरी वस्ती असल्याने घटनास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

# मराठी कुटुंब मारहाणप्रकरणी राजकारण नको मात्र आरोपीला कठोर शिक्षा व्हावी

## – कल्याण पश्चिमेचे आमदार विश्वनाथ भोईर



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

दि.२१ : कल्याणच्या योगीधाम परिसरात घडलेल्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्रातील वातावरण ढवळून निघाले आहे. कल्याणात झालेल्या या प्रकाराने आपण आश्चर्यचकित झालो असून याप्रकरणी राजकारण करू नका. मात्र संबंधित आरोपीला कठोरात कठोर शिक्षा होणे गरजेचे असल्याचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी याप्रकरणी स्पष्ट केले आहे.

कल्याण हे सर्व जातीधर्मांना एकत्रित सांभाळून चालणारे ऐतिहासिक शहर असून इथे अशी घटना घडते. मात्र त्यामध्ये कोणीही राजकारण करू नये यातील जे आरोपी आहेत त्यांना कठोरात कठोर शिक्षा कशी होईल यासाठी पोलिस प्रशासनाने प्रयत्न केले पाहिजे. कल्याणातील एका उच्चभ्रू सोसायटीत घडलेला हा प्रकार बघून आपण आश्चर्यचकित झालो आहोत, अशाठिकाणी असा प्रकार करणारे ज्या प्रवृत्तीचे लोक आहेत.त्या प्रवृत्तीला वेळीच आवर घालणे आणि कठोरात कठोर शिक्षा होणे हे गरजेचे असल्याचे मत आमदार विश्वनाथ भोईर यांनी व्यक्त केले. तर पोलिसांनी आजच्या दिवसात त्या सर्व आरोपींना अटक करावी. अन्यथा उद्या आपण हिवाळी अधिवेशनात हा प्रश्न वेगळ्या पद्धतीने मांडण्याचा इशाराही आमदार भोईर यांनी दिला आहे. तर हे प्रकरण जास्त चिघळू नये म्हणून सर्व समाजातील लोकांनी शांतता पाळावी, शहरातील शांततेला गालबोट लागेल असं काही करू नये असे आवाहनही आमदार विश्वनाथ भोईर यांनी केले आहे.

# ‘श्री गोपाळ लालमंदिरा’च्या अनधिकृत बांधकामावर कारवाई

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता भाईंदर(प्रतिनिधी) :**

दि.२१ : मिरा रोड येथील गोकुळ व्हिलेज येथील ‘श्री गोपाळ लाल ‘मंदिराच्या अनधिकृत बांधकामावर महापालिका प्रशासनाने कारवाई करण्यास सुरुवात केली. यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.



मिरा रोड येथील गोकुळ व्हिलेज परिसरात ‘श्री गोपाळ लालमंदिर ‘मंदिर आहे. या मंदिरात अनेक स्थानिक नगरिक हजेरी लावत असतात. मात्र हे मंदिर सोसायटीच्या आर.जी ( रिक्रेशन गार्डन )जागेवर उभारण्यात आले असल्याचा दावा अनेक वर्षांपासून करण्यात येत आहे. विकासकाने परस्पर ही जागा धार्मिक संस्थेच्या हाती दिल्यामुळे हा वाद उभा राहिला आहे. त्यामुळे या विरोधात सोसायटीमधील पदाधिकारी बऱ्याच वर्षांपासून महा पालिका, जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रारी करत होते. यावर दाद मिळत नसल्याने अखेर न्यायालयात खटला दाखल करण्यात आला होता. त्यावरून मंदिरामधील अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते.परंतु महा पालिकेकडून यावर कारवाई करण्याकडे दिरंगाई केली जात होती.दरम्यान हे प्रकरण पेटू लागल्यानंतर शुक्रवारी महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने मोठा पोलिस बंदोबस्त घेऊन मंदिरावर कारवाई केली. यावेळी प्रशासनाच्या कारवाईचा विरोध करण्यासाठी अनेकजण एकवटले होते. काहींनी कारवाईला विरोध केल्यामुळे पोलिसांनी शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी आठ ते नऊ जणांवर गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया हाती घेतली असल्याची माहिती उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी दिली आहे. तर मंदिराचे जीने आणि काही भागच अनधिकृत असल्याने ते तोडण्यात आले असल्याची माहिती अतिक्रमण विभागाचे मुख्य अधिकारी नरेंद्र चव्हाण यांनी दिली आहे.

# महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा ठाणे जिल्हा दौरा

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ठाणे(प्रतिनिधी) :** दि.२१ : महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दि.२१ डिसेंबर २०२४ रोजी ठाणे जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे आहे.
सायंकाळी ०५.१५ वा. मुंबई विमानतळ येथून मोटारीने ठाणे निवासस्थानाकडे प्रयाण.
सायंकाळी ०५.४५ वा. ठाणे निवासस्थान, ठाणे येथे आगमन व राखीव.

# शहापूर तालुक्यातील नडगाव येथे शेतकरी मेळावा संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :**

दि.२१ : डिसेंबर २०२४ रोजी अग्रणी बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, ठाणे, मार्डफ ट्रस्ट, पुणे व आर्थिक साक्षरता केंद्र, ठाणे यांच्यावतीने मौजे नडगाव ग्रामपंचायत, नडगाव, तालुका शहापूर, जिल्हा ठाणे येथील किसान विद्यालय व ज्युनियर कॉलेज नडगाव येथे शेतकरी मेळावा संपन्न झाला.

या शिबिरास ७० शेतकरी बांधवांनी उपस्थिती दर्शविली. या कार्यक्रमास जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक श्री.अभिषेक पवार व नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक श्री.सुधांशूकुमार अश्विनी, ग्रामसचिव श्री. भरत डोंगरे, मुख्याध्यापक श्री.शिर्के, सरपंच कमल रेरा दुर्गे, ग्रामपंचायत ग्रामस्थ, शेतकरी वर्ग, महिला बचत गट सदस्य यांची विशेष उपस्थिती होती. तसेच जिल्हा उद्योग केंद्र निरीक्षक श्रीमती मनीषा देवरे, आदिवासी विकास प्रतिष्ठानच्या श्रीमती प्रमिला माश्रम उपस्थित होत्या.

या मेळाव्यामध्ये अभिषेक पवार यांनी उपस्थित शेतकरी बांधवांना बँक स्तरावरील विविध योजना हो किसान क्रेडिट कार्ड तसेच शेतीपूरक योजनांमधून आपला विकास शेतकरी बांधवांनी करावा याबाबत संवाद साधला.

नाबार्ड अंतर्गत शेतीविषयक योजनांबाबत श्री.सुधांशूकुमार अश्विनी यांनी वेअर हाऊस, भाजीपाला लागवड, वाडी प्रकल्प, डेअरी, पोल्ट्री, शेळीपालन याबाबत योजना व अनुदानांबाबत माहिती दिली.जिल्हा उद्योग केंद्र ठाणे निरीक्षक मनीषा देवरे यांनी मुख्यमंत्री व प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम याबाबत माहिती देवून शेतकरी वर्गाने या योजनांचा अधिकाधिक लाभ घ्यावा याबाबत मार्गदर्शन केले तसेच प्रमिला मसराम यांनी मशरूम शेती व्यवसायाबाबत मार्गदर्शन केले. प्रशिक्षण घेवून तरुणांनी अधिकाधिक या व्यवसायाकडे वळावे, असे आवाहन केले.

आर्थिक साक्षरता केंद्र समन्वयक सविता पावसकर यांनी उपस्थितांचे स्वागत करून आर्थिक साक्षरतेबाबत प्रबोधन केले.

# मोरा ते मुंबई जलवाहतुक समस्येविरोधात प्रवाशांची सह्यांची मोहीम सुरु




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता उरण(प्रतिनिधी) :**

दि.२१ : समुद्राच्या वाढत्या ओहटीमुळे पंधरा दिवसांतील चार दिवस मोरा ते मुंबई जलवाहतुक पाच तास बंद केली जात आहे. त्यामुळे या मार्गाने उरणवरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आणि विशेषतः नोकरवर्गाला याचा त्रास सहन करावा लागत आहे. या समस्येविरोधात नियमित प्रवाशांनी सह्यांची मोहीम सुरू केली आहे.मोरा बंदरातील गाळ हा आधुनिक पद्धतीने काढण्यात यावा. महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड आणि जलवाहतूक विभागाने लक्ष घालून ही समस्या सोडवावी अशी मागणी करण्यात आली आहे. ओहोटीच्या वेळी मोरा बंदरात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने या मार्गावरील बोटी रुतण्याची शक्यता आहे. त्यामुळे खबरदारी म्हणून ही सेवा बंद करण्यात येत आहे. मोरा बंदरात गाळ सचण्याची समस्या कायमस्वरूपी आहे. हा गाळ काढण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करूनही ही समस्या सुटलेली नाही. या समस्येला वाचा फोडण्यासाठी प्रवासी दत्ता पुरो यांनी ही स्वाक्षरी मोहीम सुरू केली आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून उरणच्या मोरा व मुंबईतील भाऊचा धक्का दरम्यान मोरा मुंबई जलसेवा सुरू आहे. या जलसेवेमुळे उरणवरून विना अडथळा मुंबईत अवघ्या अर्ध्या ते एक तासात या मार्गाने पोहचता येते. त्यामुळे उरण मधील चाकरमानी, व्यवसायिक आणि सर्वसामान्य प्रवासी ही याच मार्गाचा वापर करीत आहेत. मोरा मुंबई जल सेवा ही उरण आणि मुंबई दरम्याची महत्वाची सेवा आहे. मात्र ही सेवा सुरळीत सुरू ठेवण्याची जबाबदारी ही महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाची आहे. बोर्डाच्या अभियांत्रिकी विभागाची ही जबाबदारी आहे. मात्र या विभागाचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे ही सेवा खंडित होत आहे.

# कांधाच्या दरात घसरण

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :**



दि.२१ : गेल्या काही महिन्यांपासून कांद्याचे दर चढेच होते. घाऊक बाजारात साठी गाठलेले कांद्याचे दर आता आवाक्यात येत आहेत. घाऊक बाजारात आधी जुना कांदा प्रतिकिलो कांदा ५०-६० रुपयांवर होता. मात्र आता जुना कांदा तुरळक असून नवीन कांदा अधिक प्रमाणात दाखल होत आहे. त्यामुळे नवीन कांद्याच्या दरात प्रतिकिलो १०-१५ रुपयांनी घट झाली आहे.घाऊक बाजारात नव्या कांद्याची २०-३० रुपयांना विक्री होत आहे. एपीएमसी बाजारात उन्हाळी आणि पावसाळी अशा दोन कांद्याचा हंगाम असतो. नोव्हेंबरमध्ये पावसाळी नवीन कांदा दाखल होत असतो, मात्र परतीच्या पावसाने राज्यातील नवीन कांद्याच्या उत्पादनावर पाणी फेरले होते. त्यामुळे नवीन कांद्याचा हंगाम लांबला आणि जुने कांदे वरचढ ठरत होते. परिणामी कांद्याच्या दरात सातत्याने वाढ होत होती. गेल्या काही महिन्यांपासून कांद्याचे दर चढेच होते. जुना कांदा घाऊक बाजारात प्रतिकिलो ७० रुपयांपर्यंत गेला होता. तर नवीन कांदे ही वरचढ ठरत होते. नवीन कांदा ५०-५५ रुपयांनी विक्री होत होता. मात्र बाजारात राज्यातील नवीन कांद्याची आवक वाढली आहे. नवीन कांदा मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्याने दर गडगडत आहेत, अशी माहिती व्यापारी मनोहर तोतलानी यांनी दिली आहे.

# फ्लेमिंगोचा अधिवास संरक्षित होणार?

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :**

दि.२१ : नवी मुंबईतील पाम बीच मार्गावर मोक्याच्या ठिकाणी असलेल्या डीपीएस तलावात खाडी मार्गाने येणारा पाण्याचा प्रवाह कोणत्याही परिस्थितीत रोखला जाता कामा नये असे स्पष्ट निर्देश राज्य सरकारने यासंबंधी नेमलेल्या वरिष्ठ तज्ज्ञ अधिकाऱ्यांच्या समितीने कांदळवन विभागाला दिले आहेत. या तलावाला संरक्षित क्षेत्र घोषित करता येऊ शकते का याची चाचपणी करण्याच्या सूचनाही या समितीने दिल्या अहेत. डीपीएस शाळेमागील ही जागा मुळात पाणथळ नाही असा दावा करत शासकीय प्राधिकरणांनी हा मोठा भूखंड बिल्डरांना विकण्याच्या हालचाली केल्या होत्या. या पार्श्वभूमीवर सरकारने नेमलेल्या समितीचे हे निर्देश महत्वाचे मानले जात अहेत.नेरुळमधील डीपीएस फ्लेमिंगो तलावात भरतीच्यावेळी येणारे पाणी सिडकोनेच बनवलेल्या नेरुळ जेट्टीच्या कामामुळे अडवलेले गेले होते. त्यामुळे डीपीएस तलाव कोरडाठाक पडून या तलावात यंदाच्या मोसमात फ्लेमिंगो येणे बंद झाले होते. याबाबत प्रसारित करत हे प्रकरण उघडकीस आणले होते. याबाबत पर्यावरणप्रेमींनी नाराजी व्यक्त केली होती. कांदळवन नष्ट करण्याबरोबरच फ्लेमिंगोंचा अधिवासच नष्ट करण्याचा प्रयत्न एका उद्योगसमूहासाठी केला जात असल्याचा आरोप करत पर्यावरण संस्थांनी आंदोलन केले होते.

‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अॅड. जयकुमार ए. रिजवानी